ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# बदलत्या विश्वाचे मराठी साहित्य जगतावर झालेले परिणाम

**साधना सुखदेव जाधव**
*संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग*
*शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर*

प्रस्तावना :

हे विश्वची माझे घर. या जगामध्ये अनेक चांगल्या-वाईट घडामोडी सातत्याने घडत असतात. त्यानुसार अनेक बदल होत असतात. नैसर्गिकरीत्या म्हणा किंवा कृत्रिमरीत्या म्हणा असे बदल नेहमीच घडत असतात. हे बदल कोणाला योग्य वाटतात तर कोणाला अयोग्यही वाटतात. परंतु काही कारणास्तव बदल हे आपणांस स्वीकारावेच लागतात. मग ते कोणत्याही क्षेत्रातील असोत, साहित्य, गोष्टी, वस्तू, शिक्षण, तंत्रज्ञान, समाज, वर्तन, राहणीमान, आर्थिक, मानसिक, अशा अनेक क्षेत्रांतील बदल आपणांस वेळोवेळी स्वीकारावे लागतात. हे बदल स्वीकारताना यामुळे आपला काही फायदा होणार आहे का? तसेच यामुळे आपले काही नुकसान तर होणार नाही ना? याचाही विचार करावा लागतो. याबरोबरच नेमके कुठे कुठे आपण या बदलाचा उपयोग करू शकतो. अशा अनेक गोष्टींचा विचार आपणांस करावा लागतो. उदा. कपडे, भाषा, वर्तन. याउलट अपवादात्मक परिस्थितीत कधी कधी आपणांस काही बदल स्वीकारावेच लागतात. उदा. दुष्काळ, महापूर, रोगराई, अशा नैसर्गिक आपत्ती अचानक येतात. अशावेळी विचार करायलाही आपल्याजवळ वेळ नसतो. अशावेळी दुसरा काहीही विचार न करता पटकन यापुढील मार्ग काढावा लागतो. व आपला जीव वाचवावा लागतो. याचे अनेक चांगले-वाईट परिणाम समाज जीवनावर होतात. असे अनेक बदल या विश्वामध्ये सतत घडत असतात. या बदलाचा चांगला-वाईट परिणाम जगातील सर्वच घटकांवर होत असतो. अशा वेळी 'परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे' म्हणून तो स्वीकारून त्यातून चांगले काहीतरी होईल अशी अपेक्षा ठेवावी. याबरोबरच कधी कधी वाईट गोष्टीही स्वीकाराव्या लागतात. अशावेळी संयम राखून त्यातून बाहेर पडावे. त्यातून काही नवीन शिकवण घ्यावी. जीवन जगताना अशा काही चांगल्या-वाईट गोष्टींचा अनुभव सोबत असावा. त्यातूनच आपण घडत जातो.

या बदलत्या विश्वाचा परिणाम जगातील अनेक घटकांवर होत आहे. यामध्ये काही चांगले घडत आहे. तसेच काही वाईटही घडत आहे. यामध्ये समाज, शिक्षण, तंत्रज्ञान, साहित्य, निसर्ग, व्यवसाय, उद्योगधंदे, नोकऱ्या, आचार-विचार, आहार-विहार, मानवी जीवन, आर्थिक, सामाजिक व राजकीय घडामोडी, जीवसृष्टी अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो. यातील मराठी साहित्यावर बदलत्या विश्वाचा काय परिणाम झाला ते आपण पाहणार आहोत.

**साहित्य:**

इतरांप्रमाणेच बदलत्या विश्वाचा साहित्य जगतावरही खोल परिणाम झालेला दिसून येतो. फार पूर्वी साहित्यामध्ये म्हणावी तशी प्रगती नव्हती. परंतु काळानुसार हळूहळू साहित्य क्षेत्रामध्ये प्रगती होऊ लागली. छपाई यंत्राचा शोध लागल्यानंतर अनेक पुस्तके छापली जाऊ लागली. हि पुस्तके मोठ्या प्रमाणात वाचली जाऊ लागली. त्या त्या काळानुसार साहित्यामध्ये बदल होऊ लागला. ठराविक कालखंडातील समाजाचे चित्रण त्या काळातील साहित्यामधून आपणांस पाहायला मिळते. आपले अनुभव व मते साहित्यातून मांडली जातात. यामध्ये काळानुसार बदल दिसून येतो. कथा, काव्य, नाटक, कादंबरी, लेख, समीक्षा, आत्मचरित्र अशा वेगवेगळ्या प्रकारचे लेखन साहित्यातून आपणांस दिसून येते. मराठी, हिंदी, इंग्रजी, तमिळ, कानडी, अशा अनेक वेगवेगळ्या भाषांमधून हे साहित्य प्रकाशित होत असते.

बदलत्या विश्वाचा या साहित्यावरही परिणाम झालेला दिसून येतो. पूर्वी छापील स्वरूपातील माध्यमावर लोकांचा फार विश्वास असायचा. लोक आवडीने वाचन करीत असत. परंतु आज आधुनिक तंत्रज्ञानामुळे फार प्रगती झाली आहे. सर्व काही आज एका जागेवर बसून आपणांस मिळत आहे. अनेक पुस्तके आज आपण मोबाईलवर इंटरनेटच्या सहाय्याने वाचू शकतो. तसेच ऑनलाईन लिहूही शकतो. ब्लॉग, फेसबुक, whatsapp, youtube यांच्या माध्यमातून लेखन प्रदर्शित करता येते. तसेच प्रकाशितही करता येते. यामुळे श्रमात, वेळेत व खर्चातही बचत होत आहे. परंतु सर्वांनाच हे ऑनलाइन माध्यम परवडणारे नसल्यामुळे वाचक वर्ग कमी आहे.

वाढत्या स्पर्धामुळे साहित्यामध्येही अनेक वेगवेगळे प्रवाह येऊ पाहत आहेत. लिहिणारा प्रत्येकजण आपापली मते,

अनुभव, प्रतिभा, सर्जनशीलता व दूरदृष्टी यातून लेखन करत आहेत. यामुळे साहित्यात विविधता येते. एक वेगळेपण जाणवते. याबरोबरच साहित्यिकांना पूर्वीसारखा प्रतिसादही मिळत नाही.

याबरोबरच कोरोनासारख्या महाकाय रोगामुळे सर्वत्र फारच दयनीय अवस्था झाली आहे. कोरोनामुळे गेल्या दीड वर्षापासून साहित्य क्षेत्रावर फारच मोठा परिणाम दिसून येत आहे. संपूर्ण लॉकडाऊनच्या नावाखाली पुस्तके मोठ्या प्रमाणात छापली जात नाहीत. व वाचलीही जात नाहीत. यातून फक्त आपल्याला जिवंत राहायचे आहे. अशी आशा धरून लोक जगत आहेत. प्रत्येकाच्या घरातील कुणी न कुणीतरी या कोरोनाची शिकार झाले आहेत. त्यामुळे सर्वत्र नैराश्याचे वातावरण पसरलेले आहे. या सर्वांचा परिणाम साहित्यावर पडतो आहे.

याप्रमाणेच या बदलत्या विश्वाचा मराठी साहित्यावरही दूरगामी परिणाम झालेला दिसून येतो.

**बदलत्या विश्वाचा मराठी साहित्यावरील परिणाम :**

बदलत्या विश्वामध्ये काही चांगल्या गोष्टी घडतात तशा काही वाईटही घडतात. त्यामुळे कधी फायदा होतो तर कधी तोटाही सहन करावा लागतो. प्रत्येकाने आपल्या सोयीनुसार त्याचा उपयोग करून घ्यावा.

**चांगले परिणाम :**

१. मराठी साहित्य मोठ्या प्रमाणात ऑनलाइन स्वरुपात उपलब्ध होऊ लागले.
२. प्रकाशनासाठी लागणाऱ्या वेळ, श्रम व खर्चात बचत झाली.
३. अनेक वेगवेगळ्या प्रकारातील मराठी साहित्य आज मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.
४. लेखन कलेतील सर्वांगांचा समावेश आज मराठी साहित्यात झालेला आहे.
५. ऑनलाईन स्वरुपात पुस्तके उपलब्ध झाल्यामुळे वाचक वर्ग आनंदी आहे.
६. जलद स्वरुपात आपली मते समाजासमोर मांडता येतात.

**वाईट परिणाम :**

१. आज मराठी साहित्यात प्रतिभावान लेखक व कवींची संख्या कमी होताना दिसत आहे.
२. ऑनलाइन स्वरूपातील साहित्य समाजातील गरीब लोकांपर्यंत पोहोचत नाही.
३. लेखकांना पूर्वीसारखा भरभरून प्रतिसाद मिळत नाही.
४. कोरोनामुळे पुस्तकांचा खप कमी झाला आहे.
५. लेखकांना म्हणावा तितका आर्थिक मोबदला साहित्यातून मिळत नाही. त्यामुळे अनेक लेखक गरिबीत जीवन जगत आहेत. अशाप्रकारे मराठी साहित्य जगतावर बदलत्या विश्वाचे अनेक दूरगामी परिणाम झालेले आपणांस दिसून येतात.

मराठी साहित्याबरोबर जगातील अनेक घटकांवर या बदलत्या विश्वाचे अनेक चांगले-वाईट परिणाम दिसून येतात. यामध्ये निसर्ग, शिक्षण, मानवी जीवन, उद्योगधंदे, समाज, तंत्रज्ञान, आहार-विहार, आचार-विचार, नोकऱ्या, रोगराई अशा अनेक घटकांचा समावेश होतो. या बदलत्या विश्वामुळे निसर्गाची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. त्यामुळे निसर्गाचा समतोल ढासळत आहे. त्यामुळे दुष्काळ, महापूर, रोगराई यांसारख्या समस्या भेडसावत आहेत. या समस्या सोडविण्यासाठी मानवाने आपल्या मुलांप्रमाणे निसर्गाची काळजी घेतली पाहिजे. निसर्ग मानवाला वरदान आहे. त्यामुळे मानवाने वृक्षतोड कमी करावी. झाडे लावणे व त्यांना वाढविणे. पाणी जमिनीत जिरविणे. प्रदूषण कमी करणे. पाण्याचा काटकसरीने वापर करणे. अशा उपाययोजना प्रत्येकाने राबविल्या पाहिजेत. तसेच शिक्षणातही अनेक बदल झालेले दिसून येतात. शिक्षणाचे अनेक प्रवाह आज सर्वांच्या अगदी घराजवळ उपलब्ध आहेत असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. तरीही सर्वांनाच चांगले शिक्षण घेता येत नाही. शिक्षणात तंत्रज्ञानाने भरपूर प्रगती केली आहे. आज कोरोन काळात तर सर्व शिक्षण प्रणाली ऑनलाइन मोबाईल, कॉम्पुटर, टीव्हीवर सुरु आहे. परंतु समाजातील सर्वच घटकांपर्यंत ही शिक्षण प्रणाली पोहोचू शकत नाही.

याबरोबरच समाजही पूर्वीसारखा एकसंध राहिला नाही. समाजात समता, एकता राहिली नाही. मानवी जीवन तर पार बदलून गेले आहे. जो तो स्वार्थी वृत्तीचा बनत चालला आहे. माणुसकी लोप पावत आहे. लोक शिकले पण त्यांना म्हणावा तसा रोजगार उपलब्ध नाही. त्यामुळे सुशिक्षित बेकारी वाढत आहे. सर्वसामान्य लोकांची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट आहे. त्यामुळे लोक वाम मार्गाकडे वळत आहेत. काही आत्महत्या करत आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. कारण शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे शेतीसाठी घेतलेले कर्ज फिटले जात नाही. अशा परिस्थितीत शेतकरी हवालदिल होतात. त्यांना व कुटुंबाला उपासमार सहन करावी लागते. याउलट इकडे व्यापारी लोक मधल्या मध्ये भरमसाठ पैसे

कमावतात, मालामाल होतात. हे कुठे तरी थांबले पाहिजे. शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळाला पाहिजे.

याबरोबरच विभक्त कुटुंब पद्धती व अनुकरण पद्धतीमुळे लोकांचे आहार-विहार, आचार-विचार यामध्ये बदल होत आहे. माणूस एकलकोंडा व नैराश्यमय बनत चालला आहे. माणसापेक्षा पैसा व वस्तूंवरच त्याचे प्रेम जास्त आहे. यामुळे तो आपली संस्कृती विसरत चालला आहे. एका बाजूला आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने माणूस नवनवीन शोध लावत असला तरी दुसऱ्या बाजूला काही वाईट बदलही घडत आहेत. परंतु त्यामध्ये समतोल राखणे फार महत्वाचे आहे.

या कोरोना काळात तर फार भयानक परिस्थिती झाली आहे माणसाची. दिवसेंदिवस माणूसपण हरवत चालले आहे. प्रत्येकाच्या घरातील एखादी व्यक्ती या कोरोनाची शिकार झाली आहे. धड शेवटचे दर्शनही घेता येत नाही. माणूस हतबल झाला आहे. तसेच सर्व उद्योगधंदे, व्यवसाय बंद असल्यामुळे सर्वसामान्य जनतेचे फार हाल होत आहेत आणि अशातच डॉक्टर, राजकारणी आपले हात धुऊन घेत आहेत. हे कुठेतरी थांबले पाहिजे. लोकांना न्याय मिळाला पाहिजे.